## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## (नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

---

### देशभरातील प्राध्यापकांना अमरावती विद्यापीठ कौशल्य विकासाचे ऑनलाईन प्रशिक्षण देणार
### विद्यापीठाला राष्ट्रीय ज्ञानस्त्रोत केंद्र (एन.आर.सी.) मंजूर
### महाराष्ट्रातील पाच विद्यापीठांमध्ये अमरावतीचा समावेश

अमरावती.

विद्यापीठ व महाविद्यालयीन प्राचार्य आणि शिक्षकांना कौशल्य विकासाचे ऑनलाईन प्रशिक्षण मिळावे, यासाठी केंद्रीय मानव संसाधन विकास मंत्रालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्यावतीने देशभरातील विद्यापीठांमध्ये विविध महत्वपूर्ण शैक्षणिक विषयांवर राष्ट्रीय ज्ञानस्त्रोत केंद्र मंजूर केले आहे. देशभरात २७ विद्यापीठांना मंजूर झालेल्या केंद्रापैकी कौशल्य विकास हा महत्वाचा विषय संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला दिलेला आहे. भारताचे पंतप्रधान ना.श्री नरेंद्र मोदी यांनी देशभरात कौशल्य विकासाला चालना दिली असून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला मिळालेल्या एन.आर.सी. केंद्राच्या माध्यमातून आता देशभरातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांच्या प्राचार्य व शिक्षकांना कौशल्य विकासाचे ऑनलाईन प्रशिक्षण दिले जाणार आहे. कौशल्य विकासासारख्या महत्वपूर्ण विषयावर एन.आर.सी. विद्यापीठाला दिल्याबद्दल कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी महाराष्ट्र शासन, यु.जी.सी. व केंद्रीय मानव संसाधन मंत्रालयाचे आभार मानले आहे.

केंद्रीय विद्यापीठ आयोगाने नुकतीच देशभरातील विद्यापीठांचे कुलगुरु आणि मनुष्यबळ विकास केंद्राच्या संचालकांची नवी दिल्ली येथे बैठक बोलावली होती, आणि त्या बैठकीमध्ये एन.आर.सी. कार्यान्वया संदर्भात माहिती दिली. यापूर्वी विद्यापीठात मानव संसाधन विकास केंद्राची स्थापना झाली असून त्या केंद्राच्या माध्यमातून महाविद्यालयीन शिक्षकांना उद्बोधन व उजळणी वर्गाला आमंत्रित केल्या जायचे. जवळपास महिनाभर चाललेल्या प्रशिक्षणामध्ये शिक्षकांचा पूर्ण वेळ व्यतित होत होता. राष्ट्रीय ज्ञानस्त्रोत केंद्रामुळे (एन.आर.सी.) ऑनलाईन प्रशिक्षण प्राप्त होत असल्यामुळे शिक्षकांचा वेळ व शासनाच्या कोट्यावधी रुपयांची बचत होणार आहे. अमरावती विद्यापीठाला कौशल्य विकास हा विषय दिलेला आहे, या विषयावर विद्यापीठ अभ्यासक्रम तयार करणार आहे. याकरिता एन.आर.सी. अंतर्गत स्वतंत्र विद्वत परिषदेचे गठण होणार असून त्यामध्ये इतर नामांकित संस्थांमधून पाच सभासद आणि तांत्रिक तज्ज्ञांचा समावेश असेल. विद्वत परिषदेच्या माध्यमातून अद्ययावत ओरिएन्टेशन मॉडूल्स दरवर्षी तयार केल्या जातील. याशिवाय प्रशिक्षण देण्यासाठी परिषदेच्या माध्यमातून रिसोर्स पर्सनची निवड केली जाणार आहे. ‘स्वयम’ या ऑनलाईन प्रशिक्षण सुविधेच्या माध्यमातून शिक्षक हे त्यांच्या सोयीनुसार अभ्यासक्रम पूर्ण करतील, त्यांची परीक्षा देखील ऑनलाईन होईल व त्यानंतर आयोगाचे प्रमाणपत्र मिळेल.

शिक्षकांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण विद्यापीठात स्थापन झालेल्या राष्ट्रीय ज्ञानस्त्रोत केंद्राच्या माध्यमातून मिळणार असल्यामुळे त्याचा फायदा विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांना होणार आहे. त्यामुळे या भागातील विद्यार्थी रोजगारक्षम निश्चितच होतील, असा विश्वास कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी व्यक्त केला.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. १५/०५/२०१८.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी